# हिरवे पिवळे तुरे उन्हाचे!

■ प्रा. नीला कोर्डे



जितकी नाजूक फुले तितकाच कणखर वृक्ष असलेला शिरीष भारतीय संस्कृतीत खोलवर रुजला आहे. अभिजात संस्कृत साहित्यात डोकावणाऱ्या शिरीषवृक्षाची एक अनोखी ओळख...

शिरीषाविषयी लिहिताना 'मोत्यावरच्या मोहक पाण्याची शाई' आणि मुग्ध कळीची लेखणी केली पाहिजे, इतके हे फूल कोमल आहे. बाणभट्टाने 'कादंबरीत' महाश्वेतेचे वर्णन करताना 'इयत्तामिव धवलिम्न' म्हणजे शुभ्रतेची परिसीमाच म्हटले आहे. शिरीषाविषयी म्हणायचे झाल्यास मृदुतेची परिसीमा म्हणजे शिरीषपुष्प! तसे पाहिले तर वसंत आणि ग्रीष्म ऋतूत सूर्याचे तेज पिऊन फुलणारी सर्वच फुले 'सूर्यफुले' आहेत! पळस, पांगारा यांसारख्या लाल रंगाच्या फुलांनी जणू सूर्यरथाच्या सारथ्याचा अरुण रंग घेतला आहे. शिरीषफुलांनी मात्र रथाच्या अश्वांचा हरितवर्ण म्हणजे हिरवा रंग घेतला आहे. आणखीही एका अर्थाने शिरीष हरित आहे. हरित याचा अर्थ पिवळा असाही होतो. शिरीषाची फुले हिरवट पिवळसर असतात. सूर्याच्या सप्तरंगातील एकमेकांच्या जवळ असणारे हिरवा आणि पिवळा हे रंग जणू या फुलांनी घेतले आहेत. ही फुले पाहताना आठवण होते ती इंदिरा संतांच्या, 'हिरवे पिवळे तुरे उन्हाचे!' या काव्यपंक्तीची!

ग्रीष्माच्या रखरखीत उन्हात अग्निशिखांप्रमाणे असणारा पळस जसा फुलतो तसाच शीतल हिरवी रंगछटा असणारा शिरीषही फुलतो, हा एक निसर्ग चमत्कारच आहे. किंबहुना, ग्रीष्माला मिळालेल्या प्रखरतेच्या शापाला नाजूक शीतल शिरीषफुलांचा उःशाप मिळाला आहे. शिरीषाची फुले जितकी कोमल तितकाच हा वृक्ष कणखर! उंच वाढणाऱ्या या वृक्षाचे खोड चांगले मजबूत असून फांद्याही सगळीकडे पसरलेल्या असून घनदाट असतात. या फांद्यांचे छत्र धरून स्वतः ग्रीष्मातले कडक ऊन सोसत शिरीष उभा असतो. 'छायामन्यस्य कुर्वान्ति तिष्ठन्ति स्वयमातपे।' हे एका सुभाषितात केलेले वृक्षांचे वर्णन शिरीषाला यथार्थतेने लागू पडते.

याची फिकट हिरव्या रंगाची पाच-सहा छोटी छोटी पाने समोरासमोर असून टोकाला एक पान असते. शिरीषाचे एक फूल म्हणजे अनेक छोट्या फुलांचा समूह असतो. या प्रत्येक फुलातून १५-२० अत्यंत नाजूक फिकट पिवळसर हिरवे पुंकेसर निघालेले असतात. ही सारी छोटी फुले मिळून एकच फूल असल्यासारखे भासते. शिरीषाचे नाजूक रेशमी फूल जणू पावडरच्या पफसारखे दिसते. फरक इतकाच की पावडरचा पफ पावडरमध्ये बुडवल्यावर सुगंधी होतो, तर शिरीषाला मूळचाच मंद सुगंध असतो. शिरीषाला फळे म्हणजे शेंगाही येतात. कच्च्या कोवळ्या पोपटी शेंगा पोपटांना आवडतात. वाळल्यावर त्या चकचकीत नितळ पिवळ्या होतात. वाऱ्याने त्यांच्यातील छोट्या बिया खुळखुळतात. शिरीषाच्या या वैशिष्ट्यांमुळे इंग्रजीत त्याला 'पॅरट ट्री', 'वूमन्स टंग' अशी नावे आहेत. वनस्पतीशास्त्रात याला अठराव्या शतकातल्या इटालियन निसर्ग अभ्यासकाच्या एफ.डी. आल्बिझिया या नावावरून, 'आल्बिझिया लेबेक' हे नाव मिळाले आहे.

ही सर्व इंग्रजी नावे असणारा शिरीष भारतीय संस्कृतीत खोलवर रुजला आहे. त्याच्या शिरीष या मूळ नावाबरोबरच त्याला कपीतन, भण्डिल अशी काहीशी अपरिचित नावे आपल्याला अमरकोशात मिळतात. 'धन्वन्तरी निघण्टु' या ग्रंथात शिरीषाची वैशिष्ट्ये सांगणारी पुढील नावे आली आहेत.

*शिरीषो मृदुपुष्पश्च भण्डिक शंखिनीफल।*
*कपीतन शुकतरू श्यामवर्णः शुकप्रिय॥*

नाजूक फुलांचा, फळांचा आवाज येणारा, पोपटांचे आश्रयस्थान असणारा, श्यामवर्ण, पोपटांना प्रिय असलेला असा शिरीष आहे. वैद्यकशास्त्रात शिरीषाचे जे गुणधर्म सांगितले आहेत त्यामध्ये विषघ्न म्हणजे विषाचा नाश करणे हा त्याचा ठळक गुणधर्म आहे.

अभिजात संस्कृत साहित्यात वाल्मीकींच्या 'रामायण' या महाकाव्यात पंपा सरोवराच्या परिसरातील अन्य वृक्षांबरोबर शिरीषही आला आहे.

*मुचुकुन्दार्जुनश्चैव दृश्यन्ते गिरिसानुषु।*
*केतकोद्दालकाश्चैव शिरीषाः शिंशपा धवाः॥*
*रामायण किष्किन्धाकाण्ड सर्ग १ श्लो. क्र. ८१*

रामायणातील शिरीष हा फक्त अन्य वृक्षांच्या नामावलीत आला आहे. अशोक, पलाश, कर्णिकार (बहावा) यांसारख्या वृक्षांप्रमाणे त्याला खास असा संदर्भ नाही.

शिरीषावर अगदी मनापासून प्रेम आहे ते कविकुलगुरू कालिदासाचे! त्याच्या साहित्याचा मुकुटमणी मानल्या गेलेल्या 'अभिज्ञानशाकुन्तलम्' या नाटकाच्या प्रस्तावनेत नटी आणि सूत्रधार यांचा संवाद आहे. यामध्ये ग्रीष्म ऋतूला उद्देशून नटी जे गीत गाते, त्यात शिरीष कुसुमांचे वर्णन आले आहे.

*ईषदीषच्चुम्बितानि भ्रमरैः सुकुमारकेसरशिखानि।*
*अवतंसयन्ति दयमानाः प्रमदाः शिरीषकुसुमानि॥*
*- अभिज्ञानशाकुन्तलम् अंक १ श्लो. क्र. ४*

अर्थ- अगदी हळुवारपणे भ्रमर ज्यांच्या सुकुमार परागांच्या रेणूंचे चुंबन घेतात अशी शिरीषांची फुले, कोमल अंतःकरणाच्या स्त्रिया अवतंस म्हणजे कर्णालंकार म्हणून धारण करतात.

नाजूक शिरीषकुसुमे धारण करणाऱ्या स्त्रियाही तितक्याच कोमल अंतःकरणाच्या आहेत. म्हणजेच येथे जणू 'समसमा संयोगच' झाला आहे.

शिरीषपुष्पांच्या कोमलतेची जाणीव भ्रमरांनाही आहे. ही फुलेच मुळात पराकाष्ठेची नाजूक तर त्यांचे पराग आणि त्या परागांचे अग्रभाग किती नाजूक असतील! येथे नाजुकतेचा मोहक प्रकर्ष झाला आहे. प्राचीन काळी शिरीषाची फुले कर्णालंकार म्हणून धारण करण्यात येत असत. कालिदासाने या कर्णालंकाराचा 'अवतंस' म्हणून जो उल्लेख केला आहे, तो वैशिष्ट्यपूर्ण आहे. अवतंस म्हणजे फुलांचा गुच्छ बनवून तो कानावर बांधला जात असे. कर्णालंकार म्हणून शिरीषाच्या फुलांचा वापर केला गेल्यामुळे शिरीषालाच 'कर्णपूर' हे दुसरे नाव मिळाले. शाकुंतलात अन्यत्रही शिरीषाच्या कर्णालंकाराचा उल्लेख आला आहे. शाकुंतलाच्या पहिल्याच अंकात दुष्यंत राजा जेव्हा मालिनी नदीच्या तीरावरील कण्व मुनींच्या आश्रमात येतो तेव्हा त्याला शकुंतला दिसते, आपल्या अनसूया आणि प्रियंवदा या दोन सख्यांसमवेत झाडांना पाणी घालताना! या आश्रमकन्येच्या प्रथमदर्शनीच प्रेमात पडलेल्या दुष्यंताने जलसिंचनाच्या श्रमाने शांत झालेल्या तिच्या मुखाचे केलेले वर्णन म्हणजे स्वभावोक्ति अलंकाराचे उत्कृष्ट उदाहरण आहे. यामध्ये नाजूक शकुंतलेने धारण केलेले तिच्याइतकेच नाजूक शिरीषपुष्पही आले आहे. दुष्यंत म्हणतो-

*स्त्रस्तासावतिमात्रलोहिततलौ बाहू घटोक्षेपणादद्यापि*
*स्तनवेपथुं जनयति श्वास प्रमाणिधिक।*
*बद्धं कर्णशिरीषरोधि वदने घर्माम्भसां जालकं*
*बन्धे स्त्रंसिनि चैकहस्तयमिताः पर्याकुला मूर्धजाः॥*
*शाकुन्तल अंक १ श्लो. क्र. ३०*

अर्थ- घट उचलल्यामुळे हिचे खांदे गळून गेले आहेत आणि हातांचे तळवे अगदी लालबुंद झाले आहेत. फार धाप लागल्यामुळे हिच्या मुखावर स्वेदबिंदू डवरले असून त्यामुळे हिच्या कानावरील शिरीषाचे फूल गुंतून बसले आहे. गाठ सुटल्यामुळे विस्कटलेले केस हिने एका हाताने सावरून धरले आहेत. शकुंतला शिरीषाचे फूल कर्णालंकार म्हणून धारण करीत असल्याचा उल्लेख शाकुंतलाच्या सहाव्या अंकातही आला आहे. दुर्वास मुनींच्या शापाच्या प्रभावामुळे शकुंतलेचा अव्हेर केल्यानंतर तिच्या विरहाने व्याकुळ झालेला दुष्यंत, मनोविनोदनार्थ चित्रफलकावर तिचे चित्र रेखाटतो. या चित्रात शकुंतलेचे आवडते अलंकार दाखवायचे राहून गेले आहेत. हे दुष्यंताच्या ध्यानात येते. या अलंकारांतील एक अलंकार आहे तिचे कर्णभूषण शिरीषपुष्प! त्याचा उल्लेख करताना दुष्यंत आपला प्रिय मित्र विदूषक माढव्य याला म्हणतो-

*कृतं न कर्णार्पितबन्धनं सखे*
*शिरीषमागण्डविलम्बिकेसरम्।*
*शाकुंतल अंक ६ श्लो. क्र. १८ पूर्वार्ध*

अर्थ- मित्रा, जे कानावर बांधलेले आहे आणि ज्याचे पराग गालावर लोंबत आहेत असे शिरीषाचे फूल काढले नाही. कालिदासाच्या 'रघुवंश' या महाकाव्यातही कर्णालंकार म्हणून शिरीषाचा उल्लेख आला आहे. रघुवंशात ग्रीष्म ऋतूचे सुंदर वर्णन आले आहे. त्यामध्येही घर्मबिंदूंनी शिरीषपुष्प युवतीच्या गालावर चिकटून बसल्याचा उल्लेख आहे-

*स्वेदानुविद्धार्द्रनखक्षाङ्के। भूयिष्ठसंदरष्टशिखं कपोले*
*च्युतं न कर्णादपि कामिनीनां शिरीषपुष्पं सहसा पपात॥*
*रघुवंश सर्ग १६ श्लो. क्र. ४८*

अर्थ- शिरीषपुष्पाचे केसर कामिनींच्या प्रियतमाकडून नखक्षते केलेल्या गालावर स्वेदबिंदूमुळे चिकटून बसले होते. त्यामुळे कानावरून ओघळले असूनही शिरीषपुष्प एकाएकी खाली पडले नाही. या श्लोकात घर्मबिंदूंनी नाजूक शिरीषपुष्प गालावर चिकटून बसण्याच्या कल्पनेची कालिदासाकडून पुनरावृत्ती झाली असली तरी, या कल्पनेशी संबंधित असणारे संदर्भ वेगळे आहेत. शाकुंतलातली शकुंतला स्वतःच एक अनाघ्रात (कोणीही न हुंगलेले) पुष्प आहे.

*प्रणयचंचला त्या भूलीला*
*अवगत नव्हत्या कुमारिकेला*

या बालकवींनी वर्णिलेल्या फुलराणीप्रमाणे असणारी शकुंतला तपोवनाच्या शांत सात्त्विक वातावरणात वाढली आहे. या उलट रघुवंशातील स्त्रियांच्या गालावरील नखक्षतांच्या उल्लेखावरून या स्त्रियांचे सौंदर्य अनाघ्रात नसून उपभुक्त आहे हे कालिदासाने सूचित केले आहे. शिवाय आश्रमकन्या शकुंतलेला सोने-मोती, हिरे-माणिके यांचे अलंकार उपलब्ध नाहीत. म्हणूनच ही निसर्गकन्या निसर्गाने दिलेले पुष्पालंकार धारण करते. रघुवंशातील अयोध्या नगरीतील स्त्रियांनी मात्र ग्रीष्म ऋतूत शीतल शिरीषपुष्पे धारण केली आहेत ती शीतोपचार म्हणून!

रघुवंशातील आणखी एका श्लोकात आलेली



शिरीष फुले त्यांच्या वर्णनातील वेगळेपणामुळे उठून दिसतात. कालिदास म्हणतो-

*अमी शिरीषप्रसवावतंसाः प्रभ्रंशिनो वारिविहारिणीनाम्।*
*पारिप्लवाः स्त्रोतसि निम्नगायाः शैवाललोलांश्छलयन्ति मीनान्॥*
*रघुवंश सर्ग १६ श्लो. क्र. ६१*

अर्थ- कुश राजाच्या राण्या जलक्रीडा करीत असता त्यांच्या कानांतील शिरीष फुले नदीत पडून तरंगत होती. माशांना ती शेवाळांप्रमाणे भासल्यामुळे मासे त्यांचे भक्षण करू पाहत होते. हा श्लोक म्हणजे 'भ्रान्तिमान' अलंकाराचे एक सुंदर उदाहरण आहे.

कालिदासाने आपल्या 'कुमारसम्भवम्' या कार्तिकेयाची जन्मकथा असणाऱ्या महाकाव्यात, शिरीषाच्या कोमलतेचा उल्लेख केला आहे. मात्र त्याने पार्वतीच्या भुजा शिरीषपुष्पापेक्षाही अधिक सुकुमार असल्याचे म्हटले आहे-

*शिरीषपुष्पाधिक सौकुमार्यौ बाहू तदीयाविति मे वितर्कः।*
*पराजितेनापि कृतौ हरस्य यौ कण्ठपाशौ मकरध्वजेन॥*
*कुमारसम्भवम् सर्ग १ श्लो. क्र. ४१*

अर्थ- कवी म्हणतो, ''माझी अशी कल्पना आहे की पार्वतीच्या भुजा शिरीषाच्या फुलाहूनही अधिक कोमल होत्या. म्हणूनच कुसुमायुध कामदेवाने शिवाकडून पराभूत झाल्यानंतर त्याच्या गळ्याभोवती पार्वतीचा बाहुपाश घातला. कुमारसंभवातील जटिल-पार्वती संवादातही शिरीषाच्या कोमलतेचा उल्लेख आहे. शिवप्राप्तीसाठी तप करणाऱ्या पार्वतीची परीक्षा पाहण्यासाठी स्वतः शिवच जटिलाच्या म्हणजे ब्रह्मचाऱ्याच्या रूपात पार्वतीकडे येतो आणि तिच्यासारख्या कोमल युवतीने कठोर तप करणे योग्य नव्हे हे सांगताना, तो 'पेलव' म्हणजे नाजूक शिरीषाचाच दृष्टान्त देतो. तो म्हणतो-

*मनीषिताः सन्ति गृहेषु देवतास्तप क्ववत्से क्व च तावकं वपुः।*
*पदं सहेत भ्रमरस्य पेलवं शिरीषपुष्पं न पुन पतत्रिण॥*
*कुमारसंभवम् सर्ग ५ श्लो. क्र. ४*

अर्थ- हे वत्से, तुझ्या गृहात इच्छित गोष्टी देणाऱ्या देवता आहेत. कुठे तुझे तप आणि कुठे तुझी कोमल तनु! शिरीषाचे नाजूक फूल भ्रमराचे पद (पाय, पाऊल) सहन करू शकेल, परंतु पक्ष्याचे नाही! कालिदासाच्या 'मेघदूत' या गीतिकाव्यात शिरीषाचा एकदाच ओझरता उल्लेख आला आहे. अलका नगरीतील स्त्रियांना एकाच वेळी सर्व ऋतूंतील फुले उपलब्ध असतात हे सांगताना कालिदासाने ग्रीष्मातील शिरीषाचा 'चारुकर्णे शिरीषम्' (या स्त्रियांच्या कानावर सुंदर शिरीषपुष्प असते) असा निर्देश केला आहे. या कोमल शिरीषाने कालिदासाच्या काव्यालाच जणू कोमलतेचा स्पर्श केला आहे. कालिदासानंतर म्हणजे इ.स.च्या सातव्या शतकात होऊन गेलेल्या माघ कवीच्या 'शिशुपालवधम्' या महाकाव्यातील ग्रीष्म ऋतुवर्णनात शिरीष आला आहे. माघ म्हणते-

*रवितुरङ्गतनुरुहतुल्यतां दधति यत्र शिरीष रजोरुच।*
*शिशुपालवधम् सर्ग ६ श्लो. क्र. २२*

अर्थ- वसंत ऋतूनंतर ज्या ऋतूत शिरीषपुष्पांच्या परागांची कांती सूर्याच्या घोड्यांच्या रोमावलीप्रमाणे रूप धारण करते असा ग्रीष्म ऋतू आला. येथे माघाने शिरीषाच्या हरित म्हणजे हिरवट पिवळसर फुलांना सूर्याच्या रथाला जोडलेल्या हिरव्या घोड्यांच्या अंगावरील रोमांचांची उपमा दिली आहे. एरवी शिरीषाचा उपमान म्हणून वापर केला गेला असला, तरी येथे मात्र तो उपमेय म्हणून आला आहे हे या वर्णनातील वेगळेपण आहे. सूर्याचे अधिराज्य असणाऱ्या ग्रीष्म ऋतूत फुलणाऱ्या हरित शिरीषाचा, माघाने सूर्याच्या हरित अश्वांशी येथे अगदी सहजतेने संबंध जोडला आहे. सम्राट हर्षवर्धनाच्या राजसभेतील कवी बाणभट्ट याच्या 'हर्षचरितम्' या गद्यकाव्यात शिरीषाचा एक सुंदर उल्लेख आपल्याला पाहावयास मिळतो. हर्षाच्या जन्मोत्सवाच्या वेळी नृत्य करणाऱ्या स्त्रियांनी कर्णपूर म्हणून धारण केलेल्या शिरीषाच्या गुच्छांविषयी बाण म्हणतो-

*समुल्लसद्भि शिरीषकुसुम-स्तबक-कर्णपूरैः*
*शुकपिच्छमय इव हरिच्छायोऽभूदातप।*

अर्थ- फुललेल्या शिरीषकुसुमांच्या गुच्छांच्या कर्णपुरांमुळे पोपटाच्या पिसांनी भरून गेल्याप्रमाणे ऊनच हिरव्या रंगाचे झाले. येथे बाणाने नाजूक हिरवट शिरीष फुलांना दिलेली पोपटाच्या पिसांची उपमा यथार्थ तर आहेच, परंतु त्यांच्यामुळे ऊन हिरवे होण्याचीही रंगसंक्रमणाची कल्पना नितांतसुंदर आहे. बाणाचे रंगभान हा स्वतंत्र विवेचनाचा विषय आहे. पोपट आणि शिरीष यांचे नाते शिरीषाच्या 'शुकतरू' आणि 'शुकप्रिय' या संस्कृत नावांतून स्पष्ट झाले आहे. बाणाने शिरीष फुलांना दिलेली पोपटाच्या पिसांची उपमा पाहून आठवते ती बहिणाबाई चौधरींनी पळसफुलांना दिलेली पोपटाच्या चोचीची उपमा! पळसफुलांविषयी बहिणाबाई म्हणतात-

*इसरले लाल चोची*
*मिठू गेले कुठे उडी*

तसेच या हिरवट शिरीष फुलांविषयी म्हणावेसे वाटते की, पोपटच आपली पिसे शिरीषाच्या झाडावर तर विसरून गेले नाहीत ना? प्रभातकाळी घरट्यातून उडाल्यावर या विसरून गेलेल्या पिसांच्या आठवणीने तर ते 'कीर' 'कीर' असा आवाज करीत नाहीत ना? म्हणून तर पोपटाला संस्कृतमध्ये 'कीर' हे नाव मिळाले नाही ना? हिरवट फुले येणारा शिरीष 'शुकतरू' म्हणजे पोपटांचे आश्रयस्थान असणे हे रंगगोपनाचे एक सुंदर उदाहरण आहे. कालिदासाप्रमाणेच बाणानेही आपल्या 'कादम्बरी' आणि 'हर्षचरितम्' या गद्यकाव्यांमध्ये स्त्रियांच्या कोमल कायेला शिरीष फुलांची उपमा दिली आहे. पण मनात मात्र ठसते ती ही 'शुकपिच्छांची' उपमा!

केवळ कलात्मक काव्यांमध्येच नव्हे तर भर्तृहरीच्या नीतिशतकासारख्या व्यवहारज्ञानाचे पाठ देणाऱ्या काव्यामध्येही शिरीषाला स्थान मिळाले आहे. नीतिशतकातील 'अज्ञपद्धती'त मूर्ख मनुष्याला मार्गदर्शन करणे, सुधारणे कसे कठीण आहे हे सांगताना भर्तृहरि म्हणतो-

*भेत्तुं वज्रमणि शिरीषकुसुमप्रान्तेन सह्यति।*
*नीतीशतकम्-अज्ञपद्धति*

अर्थ- जो मूर्खाला योग्य मार्गावर नेण्यासाठी पराकाष्ठेचे प्रयत्न करतो तो जणू शिरीष-कुसुमाच्या टोकाने वज्रमण्याचाच भेद करण्याची इच्छा करतो.

तसे पाहिले तर संस्कृत साहित्यात बकुल, अशोक, कदंब यांसारख्या वृक्षांप्रमाणे शिरीष विपुलतेने फुललेला नाही. मराठी साहित्यात तर शिरीष अभावानेच आढळतो. जनकवी पी. सावळाराम यांनी रचलेल्या आणि लता मंगेशकर यांनी गायिलेल्या 'रघुनंदन आले आले धरणीमाता कानी बोले' या अहिल्येविषयीच्या भावगीतात-

*शिरीषकुसुमाहुनिही कोमल*
*कोमेजून ती काया जाईल*

ही शिरीषविषयक काव्यपंक्ती आली आहे.

मराठीत शिरीषाचा उपयोग फक्त मुलाचे नाव ठेवण्यासाठीच केला गेला आहे. मुलाचे शिरीष हे नावसुद्धा नाजूक शिरीष फुलापेक्षा कणखर शिरीष वृक्षालाच जवळचे आहे. याला अपवाद आहे तो सुप्रसिद्ध लेखिका शिरीष पै यांचा! शिरीष म्हटल्यावर आणखी आठवतो तो गुजराथमधील नंदुरबारचा शिरीषकुमार! कोवळ्या वयात ब्रिटिशांच्या बंदुकीच्या गोळ्या छातीवर झेलून देशासाठी प्राणत्याग करणारा! शिरीषाविषयी लिहिताना आणखी एक विशेष गोष्ट सांगावीशी वाटते. आजच्या या बेगडी दुनियेत खरे आणि खोटे यांची नेहमीच गल्लत होत आली आहे. त्यामुळेच शहरात उंच वाढणारा आणि इमारतींना आडोसा म्हणून लावण्यात येणारा आसुपालव अशोक समजला जातो. कळंबालाच कदंब समजतात. तसेच रस्त्याच्या दुतर्फा सर्रास लावल्या जाणाऱ्या पर्जन्यवृक्षांनाच शिरीष समजण्यात येते. अगदी शिरीषासारखाच दिसणारा परंतु नाजूक गुलाबी फुले येणारा हा पर्जन्यवृक्ष आहे परदेशातला! आज याने भारतीय संस्कृतीत खोलवर पाळेमुळे रुजलेल्या शिरीषाला मागे टाकले आहे. आज 'असुनी खास मालक घरचा' असा हा खरा शिरीष वृक्ष क्वचितच कुठे तरी कोपऱ्यात अगदी अंग चोरून उभा राहिलेला आढळतो. या हिरवट पिवळसर फुले येणाऱ्या शिरीषाला पर्जनवृक्षांच्या गुलाबी गर्दीत शोधून काढावे लागते. पर्यावरण संतुलनाच्या दृष्टीने महत्त्वाचा असणारा हा शिरीष सर्वत्र लावला गेला पाहिजे. प्राचीन संस्कृत साहित्यात फुललेला हा शिरीष आजही फुलला पाहिजे! ■











## आयुर्वेद जिज्ञासा

प्रधान वैद्य,
श्री बैद्यनाथ आयुर्वेद भवन प्रा. लि. ग्रेट नाग रोड, नागपुर – 9
care@baidyanath.info

श्री अजय सोनकर, पिंपरीचिंचवड
प्र. मला नेहमीच उन्हाळ्यात आम्लपित्ताचा त्रास होतो. उपाय सांगा.
उ. **बैद्यनाथ आम्लपित्तान्तक योग** सकाळ संध्याकाळी एक – एक टॅबलेट पाण्यासोबत घ्या. उत्कृष्ट डाळिंबाच्या रसाने युक्त **बैद्यनाथ दाडिमावलेह,** सकाळ संध्याकाळ जेवणानंतर एक–एक चमचा घ्या.

श्री नितिन भारद्वाज, अलिबाग, मुंबई
प्र. मला मूळव्याधीचा त्रास आहे. शौचास साफ होत नाही.
उ. सकाळी व संध्याकाळी **बैद्यनाथ प्रस्तुत पायोराईड टॅबलेट** 2–2 टॅबलेट पाण्यासोबत घ्या. **बैद्यनाथ प्रस्तूत अभयामृत (अभयारिष्ट स्पेशल)** 2–2 चमचे सकाळ संध्याकाळ समभाग पाण्यासोबत जेवणानंतर घ्या. रात्री झोपतांना **बैद्यनाथ कब्जहर,** एक चमचा कोमट पाण्याबरोबर घ्या.

श्री. विपीन हरदास, अहमदनगर
प्र. मला फारशी भूक लागत नाही. गॅसेसचा त्रास होतो.
उ. **बैद्यनाथ गॅसान्तक बटी सकाळ संध्याकाळ 1–1** टॅबलेट पाण्यासोबत घ्या. **बैद्यनाथ प्रस्तूत कुमार्यामृत** 2–2 चमचे सकाळ संध्याकाळ जेवणानंतर पाण्यासोबत घ्या.

श्रीमती गिरजा दिवेकर, रत्नागीरी
प्र. मला अमिबायसिसचा त्रास वारंवार होतो. कृपया आयुर्वेदिक औषधी सांगा.
उ. **बैद्यनाथ अमिबीका** 1–1 टॅबलेट सकाळ संध्याकाळ पाण्यासोबत घ्या व **बैद्यनाथ कुटजारिष्ट** 3–3 चमचे समभाग पाण्यासोबत जेवणानंतर घ्या.

श्रीमती संगीता शिंदे, पुणे
प्र. मासिक पाळीच्या वेळी माझ्या पोटात फार दुखतं. अंगावर पांढर पाणी ही फार जात.
उ. **बैद्यनाथ प्रस्तूत मेरी सखी सकाळ संध्याकाळ जेवणानंतर 2–2 चमचे समभाग पाण्यासोबत घ्या.** सकाळ संध्याकाळ **बैद्यनाथ प्रदरान्तक रस** एक–एक टॅबलेट पाण्यासोबत घ्या.

श्री आशुतोष वेले, पुणे
प्र. गेल्या चार वर्षा पासून मला डायबिटीज आहे. दिवसभराच्या कामामुळे फार थकवा जाणवतो.
उ. **बैद्यनाथ बसंत कुसूमाकर रस** सकाळ संध्याकाळ 1–1 टॅबलेट पाण्यासोबत घ्या. यामुळे शरीरात शक्ति व स्फूर्ती कायम राहण्यास मदत होईल. सकाळ संध्याकाळ जेवणांच्या 15 मिनीट अगोदर **बैद्यनाथ मधुमेहारी ग्रॅन्युल्स** 1–1 चमचा पाण्यासोबत घ्या.

श्री संजय घाटे, अहमदनगर
प्र. उन्हाळ्यात मला नेहमीच उष्णतेचा त्रास होतो. लघवी करतांना आग होते व पोटात दुखतं.
उ. **बैद्यनाथ गोक्षुरादि गुग्गुल** 1–1 टॅबलेट सकाळ संध्याकाळ पाण्यासेबत घ्या व **बैद्यनाथ चंदनासव** 3–3 चमचे सकाळ संध्याकाळ समभाग पाण्यासोबत घ्या.

बैद्यनाथच्या औषधांसोबत सविस्तर माहितीकरिता सेवनविधी दिलेली आहे. यांचा प्रयोग वैद्यकीय सल्ल्याने करावा.

अधिक माहिती करिता संपर्क करा।
फोनः (0712) 6644900, 6644905




